**सरकारतर्फे साक्षीदार क्र. ५ चा सरतपासः–**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

माझे नावः – दयानंद शेषराव श्रीभवाने,

वय – ४८ वर्षे व्यवसाय– शेती,

राहणार – रा.सिरसी हंगरगा, ता.निलंगा, जि. लातूर .

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. व्ही.एन.मेहेत्रे यांचे मार्फत सुरुः–**

१. दि.१८.१०.२०१८ रोजी पोलीसांनी मला घटनास्थळ पंचनाम्याकरीता सिरसी हंगरगा येथील सत्यभामा भंडे यांच्या शेतात बोलवले होते. त्यावेळी माझ्यासोबत सुरेश कोळेकर, सत्यभामा भंडे आणि पोलिस हे होते. पोलिसांनी आम्हाला मारामारी पाहिली का विचारले. मी ती पाहिली होती. पोलीसांनी त्या ठिकाणी पंचनामा माझ्या समक्ष पंचनामा केला. (आता मला दि.१८.१०.२०१८ रोजीचा प्रस्तुत कामातील निशाणी ५४ वरील घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला) त्या घटनास्थळ पंचनाम्यावर माझी, सुरेश कोळेकर, सत्यभामा आणि पोलिसाची सही आहे. त्यामधील मजकुर खरा व बरोबर आहे. तो पंचनामा माझ्यासमक्ष झालेला होता.

**उलटतपास आरोपी क्र.१ ते ४ तर्फे वकील डी.आर.दाड यांच्यामार्फत सुरु–**

२. घटनास्थळाच्या शेताचा सर्वे नंबर मला माहित नाही. त्या जमीनीच्या पुर्वेला बब्रुवान भंडे यांची शेती आहे. पश्चिमेला रस्ता आहे. दक्षिणेला शेषेराव भंडे यांची जमीन आणि उत्तर बाजुला शेटजी यांची जमीन आहे. हे म्हणणे खरे नाही की, वाद मिळकतीच्या बाजुला आरोपी क्र. १ ची जमीन नाही. आरोपी क्र. १ ची जमीन घटना ठिकाणच्या पुर्व बाजुला आहे. घटनास्थळ पंचनाम्यावर घटना ठिकाणच्या पुर्वेला आरोपी क्र.१ ची जमीन आहे असे लिहीले

होते का हे मला सांगता येत नाही. घटनास्थळ पंचनाम्यावरील आरोपी तेथे हजर नव्हते. घटनास्थळ आम्ही मारहाण करताना पाहिले होते. मारहाणीच्या दिवशी पंचनामा झाला नाही. भंडे यांनी केलेल्या तक्रारीची मला माहिती नाही. आरोपी आणि फिर्यादी एकमेकांचे नातेवाईक आहेत. त्यांच्यामध्ये जमीनीचा वाद चालु आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळ पंचनामा माझ्यासमक्ष झालेला नसताना त्यावर खोटी सही केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपी आणि फिर्यादीची मारामारी पाहिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादीच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी त्याठिकाणी पंचनाम्यासाठी गेलो नव्हतो.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

GUNJAVATE APARNA SHIVAJI
Digitally signed by GUNJAVATE APARNA SHIVAJI
Date: 2026.08.04 16:10:44 +0530

(**श्रीमती.ए.एस.गुंजवटे**)

दिनांक–०४/०८/२०२६.

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१,
निलंगा